ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 38 ]
Total No. of Questions : 38 ]

# A

**CCE RF**
**CCE RR**

Question Paper Serial No. **101**

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ( समाज विज्ञान )

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಮಾಧ್ಯಮ / Marathi Medium )**

**( ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ & ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Fresh & Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 06. 04. 2022 ] [ Date : 06. 04. 2022

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ] [ Max. Marks : 80

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघु उत्तरी आणि दीर्घ उत्तरी प्रकारचे 38 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघु उत्तरी आणि दीर्घ उत्तरी प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

**I. खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा : 8 × 1 = 8**

1. भारत आणि युरोप यांच्या मधील नवीन जलमार्गाचा शोध याने लावला –

   (A) कोलंबस

   (B) वास्को-दी-गामा

   (C) अलमीडा

   (D) अल्बूकर्क.

2. अली बंधूनी सूरू केलेली चळवळ –

   (A) असहकार चळवळ

   (B) खिलाफत चळवळ

   (C) नागरी कायदेभंग चळवळ

   (D) छोडो भारत चळवळ.

3. जगाच्या दोन शक्तीशाली गटात सामील न होता अवलंबलेले धोरण म्हणजे –

(A) अलिप्तवादी

(B) वर्णभेद

(C) वसाहतशाही विरोध

(D) निःशस्त्रीकरण.

4. मजुरीरहित श्रमाचे उदाहरण यापैकी एक आहे –

(A) परिचारिका

(B) शिक्षिका

(C) गृहिणी

(D) पोलिस.

5. डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी सूरु केलेले वृत्तपत्र –

(A) केसरी

(B) मूकनायक

(C) मराठा

(D) बॉम्बे समाचार.

6. नागार्जुनसागर वन्यजीव अभयारण्य या राज्यात आहे –

(A) कर्नाटक

(B) केरळ

(C) उत्तर प्रदेश

(D) तेलंगाणा.

7. या घटना दुरुस्तीनुसार तीन टप्प्यांची पंचायत व्यवस्था अस्तित्वात आली –

(A) 24 वी

(B) 42 वी

(C) 73 वी

(D) 92 वी.

8. या बँक खात्याच्या प्रकारात दिवसातून कितीही रक्कम कितीही वेळा ठेवली किंवा काढली जावू शकते –

(A) बचत खाते

(B) चालू खाते

(C) आवर्ती ठेव खाते

(D) मुदत ठेव खाते.

**II. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तर लिहा :** **8 × 1 = 8**

9. वेलस्ली आपल्या पदाचा राजीनामा देऊन इंग्लंडला का परत गेला ?

10. भारताचे पहिले राष्ट्रपती कोण ?

11. आम्ही प्रत्येक वर्षी मानवी हक्क दिवस केंव्हा साजरा करतो ?

12. जमाव ( Mob ) म्हणजे काय ?

13. पूर्व घाट आणि पश्चिम घाट कोणत्या ठिकाणी जुळतात ?

14. नदीमुखाजवळील त्रिभूज प्रदेशात कोणत्या प्रकारची अरण्ये आढळतात ?

15. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ?

16. विप्रो टेक्नॉलॉजीज चे संस्थापक कोण ?

**III. खाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नाला दोन ते चार वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा :**

**8 × 2 = 16**

17. बक्सारच्या लढाईचे परिणाम कोणते ?

18. सहाय्यक सैन्य पद्धतीतील अटी कोणत्या ?

19. पंचशील तत्वे कोणती ?

**किंवा**

मानवी हक्कांच्या अंमलबजावणी संदर्भात भारताच्या चळवळीचे वर्णन करा.

20. असंघटित क्षेत्रातील कामगार सामोरे जात असलेल्या आव्हानांची यादी तयार करा.

**किंवा**

कोणत्याही चार पर्यावरण चळवळींची नावे लिहा.

21. भारतातील प्रमुख हवामानाचे ऋतू कोणते ?

22. मातीच्या धूपेची कारणे कोणती ?

23. आवास योजना सांगा.

24. ग्राहक संरक्षण कायद्याची उद्दिष्टे कोणती ?

**IV. खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा : 9 × 3 = 27**

25. भारतात ब्रिटिश शिक्षणाचे परिणाम कोणते झाले ?

26. आर्य समाजाचे उद्देश कोणते ?

**किंवा**

भारत स्वातंत्र्यावेळी कोणत्या समस्याना सामोरे जात होता ?

27. भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध अपयशी ठरले याची कारणे कोणती ?

28. भारत आणि रशियायांच्या संबंधाचे वर्णन करा.

29. भारतातील अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठीचे घटनात्मक उपाय लिहा.

30. उद्योगधंद्याच्या स्थायीकरणावर प्रभाव पाडणारे घटक कोणते ?

**किंवा**

चक्रीवादळाच्या परिणामांची यादी तयार करा.

31. वाहतूकीचे महत्व कोणते ? वर्णन करा.

32. भारतात सध्या प्रचलित असलेल्या लिंग असमानतेचे वेगवेगळे परिमाण दर्शवा.

**किंवा**

भारताने स्वीकारलेल्या पंचायत राज व्यवस्थेच्या प्रमुख लक्षणांचे वर्णन करा.

33. बँकांची कार्ये कोणती ?

**किंवा**

आर्थिक विकासामध्ये उद्योजकांची भूमिका कोणती ?

**V. खालील प्रत्येक प्रश्नाचे आठ वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा : 4 × 4 = 16**

34. धोंडिया वाघ याने ब्रिटिशांविरुद्ध लढा कसा दिला ?

**किंवा**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील जहालमतवादींची भूमिका स्पष्ट करा.

35. स्वातंत्र्य चळवळीतोल सुभाषचंद्र बोस यांच्या भूमिकेचे वर्णन करा.

36. भारतातील महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी कोणते उपाय हाती घेण्यात आले आहेत ?

37. भारतात प्रचलित असलेल्या शेतीच्या प्रकारांची यादी बनवा.

**VI.** 38. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :** **1 + 4 = 5**

a) $23\frac{1^\circ}{2}$ उत्तर अक्षांश

b) भाक्रा नानगल

c) कावेरी नदी

d) मुंबई.

**अंध विद्यार्थ्यांसाठी पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 38 च्या ऐवजी )**

नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनेचे प्रमुख उद्देश कोणते ? **5**